# भगवान श्रीकृष्ण चंद्र पाहतात

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

संध्याकाळ संपून रात्र होऊ लागली होती आणि गोकुळ नगरीवरील आकाश निळसर काळ्या शाईसारख्या रंगाने रंगू लागले होते — जणू एक रेशमी चादरच आकाशाला झाकून टाकत होती. आभाळाच्या या पडद्यामागून तारांगण डोकावू लागले होते. जिकडेतिकडे लुकलुकणाऱ्या आणि चमचमणाऱ्या तारका दिसू लागल्या होत्या. जाईजुईचा सुगंध हवेत पसरला होता.

त्या गावातील एका घरात, नुकत्याच चालायला शिकलेल्या आणि संपूर्ण खोलीभर दुडदुडत धावणाऱ्या आपल्या मुलाला सांभाळत एक तरूण माता बसली होती.

“अरे कृष्णा,” त्याची आई, यशोदा म्हणाली. आपल्या मुलाकडे पाहात असताना तिची मान थोडी झुकलेली होती आणि तिच्या नेत्रांत ममता होती. “काय करतो आहेस तू?”

कृष्ण त्यावेळी एका मातीच्या हंड्यामध्ये डोकावून पाहात होता, जो हंडा कृष्णाची आई लोणी बनवण्यासाठी वापरत असे. त्याला जेव्हा त्या ठिकाणी त्याच्या आवडीचे काही सापडले नाही, तेव्हा

तो जवळ असलेल्या चौरंगापाशी गेला, जिथे एक छोटीशी लाकडाची बासरी पडली होती. कृष्णाने ती बासरी उचलली, थोडा वेळ बारकाईने तिचे निरीक्षण केले आणि परत ती बासरी खाली ठेवली. त्याने खोलीत सभोवार दृष्टी टाकली.

“काय झाले, कृष्णा?” यशोदेने विचारले.

“मला खेळायचे आहे,” कृष्ण म्हणाला. “पण मी काय खेळू?”

उभे राहात यशोदा म्हणाली “पाहू या काय खेळता येते ते.” “यांपैकी एखादे खेळणे चालेल का तुला?” तिने तेथे जवळच असलेल्या एका कपाटाचे दार उघडले, ज्यामध्ये निरनिराळ्या रंग, रूप, आणि आकारांची खेळणी होती.

“हऽऽऽम्,” प्रत्येक खेळणे न्याहाळत कृष्ण म्हणाला. तो दाताखाली ओठ चावत होता.

“तू इथेच थांब.” यशोदा म्हणाली. “मी तिकडच्या खोलीत जाऊन तुझ्यासाठी दुसरे एखादे खेळणे मिळते आहे का ते पाहते.”

यशोदा दुसरी काही खेळणी शोधण्यासाठी जाताच कृष्ण त्याच खोलीत दुडक्या चालीने इकडेतिकडे फिरत रूममधील प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण करू लागला. तो वस्तू उचलून पुन्हा खाली ठेवत होता. तो गालिच्याला हाताने खाली-वर करत राहिला, त्याच्या गोंड्यांशी खेळत राहिला आणि त्याचवेळी त्याला जाणवली — थंडगार आणि सुगंधित वाऱ्याची झुळूक त्याला स्पर्श करू लागल्याची.

त्याने खिडकीकडे पाहिले. यशोदेने खिडकीसमोर बांधलेला पातळसा पडदा हवेने हळूहळू हलत होता जणूकाही पडद्यावर वाऱ्याची झुळूक मंद तरंग उठवत होती. तो खिडकीच्या जवळ गेला.

“कृष्णा!” अगदी त्याचवेळी, दुसऱ्या खोलीतून त्याच्या आईचा मंजूळ आवाज तरंगत आला. “हे पाहा बरं!”

यशोदा दरवाजात आली. तिच्या हातांमध्ये दोरीचे आणि कापडाचे काही तुकडे होते तसेच इतरही काही अनोख्या गोष्टी ज्यांच्याशी कृष्ण कदाचित खेळू शकला असता.

पण — खोली तर रिकामी होती! यशोदा घाबरून जात आजुबाजूला पाहिले, तिच्या कपाळावर चिंतेने आठ्या उमटल्या. आता हा कृष्ण कुठे गेला असेल?

आणि मग तिला दिसली पडद्याआड उभ्या असलेल्या कोणाची तरी आकृती, कृष्णाची इवली-इवली पावले अर्धपारदर्शक पडद्याखालून बाहेर डोकावत होती. यशोदेने स्मितहास्य केले आणि ती खिडकीकडे गेली. तिने पडदा बाजूला केला आणि काहीतरी बोलण्यासाठी तोंड उघडणार, इतक्यात ती थांबली.

कारण तिथेच तर होता तिचा मुलगा, तिचा कृष्ण जो बाहेरील बाजूस एकटक पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर सौम्यता आणि मृदुलता पसरली होती — इतकी निरागसता की, जणूकाही ती या लोकातील नसावीच असे वाटत होते. त्याचे नेत्र निर्मळ उज्ज्वलतेने चमकत होते; आणि ते उत्कट इच्छेने परिपूर्ण होते.

आपल्या त्याच कौतुकमिश्रित दृष्टीने त्याने आपल्या आईकडे पाहिले. निःशब्दपणे, त्याने आकाशाकडे निर्देश केला. आणि तिथे होता निखालस तेजस्वी असा निळ्या रंगाच्या आकाशाच्या पटलावर नेत्रदीपकपणे चमकणारा चंद्र. तो गुलाबीसर पांढऱ्या रंगाचा पूर्ण चंद्र होता, त्याच्या पृष्ठभागावरील चमचमणारी नक्षत्रे अशी दिसत होती की, जणूकाही हिऱ्यांनी केलेले नाजूक नक्षीकामच असावे.

"मैय्या . . .," कृष्ण म्हणाला. "मला चंद्राबरोबर खेळावयाचे आहे."

"चंद्र?" यशोदेने विचारले.

"होय," कृष्ण म्हणाला. "चंद्राबरोबर. तू मला चंद्र आणून देशील का?"

"कृष्णा, मला माहीत नाही की, मी चंद्राला इथे आणू शकेन का," त्याची आई मृदुलतेने म्हणाली.

"पण — मला तर त्याच्याबरोबरच खेळावयाचे आहे." कृष्णाच्या आवाजात इतकी निरागसता आणि इतकी शुद्धतम उत्कंठा होती की, तो आवाज ऐकताच तिचे हृदय द्रवले.

"होय, मला माहीत आहे," ती म्हणाली. "पण चंद्र तर तिथे आकाशात दूरवर आहे. आणि आपण आहोत इथे, आपल्या घरात."

"मग चंद्र आपल्याबरोबर इथे का नाही? आपल्या घरात?"

"होय, ते ठीक आहे, पण आपण त्याला आपल्या घरातून पाहू शकतोच ना?"

कृष्णाने पुन्हा खिडकीतून बाहेर पाहिले. कृष्णाचे ओठ थरथर कापू लागले.

"मैया!" तो म्हणाला. त्याचे डोळे आता अश्रुंनी डबडबले होते. "मला चंद्राशी खेळायचे आहे. मला त्याच्याबरोबर खेळायचेच आहे! तू त्याला माझ्यासाठी इथे आणू शकत नाहीस का?"

यशोदेने कृष्णाच्या केसांची बट त्याच्या कानामागे खोचली. "अरे पण मग इथे असलेल्या, आपल्या एवढ्या साऱ्या खेळण्यांचे काय करायचे? ती चंद्रासारखी नसतीलही, पण तरीही त्यांच्याबरोबर खेळायला तुला आवडेलही कदाचित."

"नाही. मला चंद्रच पाहिजे आहे."

आणि मग मात्र कृष्ण अगदी कळवळून रडू लागला आणि त्याच्या मुखकमलावरून अश्रुधारा नदीच्या प्रवाहाप्रमाणे वाहू लागल्या. तो चंद्राकडे पाहण्यासाठी पुन्हा एकदा वळला. त्याच्या व्याकूळ रूदनाचे स्वर रात्रीच्या शांततेत प्रतिध्वनीत होत राहिले.

यशोदा काही उपाय सापडतो का, हे शोधण्याचा निकराचा प्रयत्न करत होती. तिचा मुलगा रडत असल्याने ती व्यथित झाली होती. ती त्याचे सांत्वन कसे करणार होती? ती त्याला चंद्र कसा आणून देणार होती?

असे प्रश्न स्वतःला विचारत असतानाच यशोदेला तिच्या डोळ्याच्या कोपऱ्यातून खोलीतल्या दुसऱ्या कोपऱ्यात असलेला धातूचा एक चमकदार अरूंद तुकडा दिसला. तो तुकडा तिच्या साडीच्या काठाला प्रतिबिंबीत करत होता. ते काय आहे हे स्पष्टपणे दिसावे यासाठी खिडकीजवळ असलेल्या तिच्या मंचकावरून ती उठली.

खरेतर, धातुचा तो तुकडा म्हणजे एका पात्राचा एक हिस्सा होता, जे पात्र गोलाकार व थोडेसे उथळ होते, चांदीसारखे चमकत होते. ते पाहताच यशोदेच्या चेहऱ्यावर हास्य पसरले. तिने ते पात्र उचलले आणि ते स्वयंपाकघरात आणले.

क्षणभरानंतर ती पुन्हा बाहेर आली आणि हळूवारपणे खिडकीपाशी गेली, जिथे तिचा मुलगा अजूनही रडत उभा होता.

“कृष्णा,” ती म्हणाली. “पाहा, मी तुझ्यासाठी काय आणले आहे.”

त्याचे हुंदके देत रडणे अचानक थांबले. आपला चेहरा मनगटाने पुसत, कृष्ण वळून आपल्या आईकडे पाहू लागला.

“पाहा?” यशोदा म्हणाली. “हा इथे चंद्र आहे.”

तिने हातातील ते पात्र कृष्णाकडे नेले. त्यात तिने पाणी भरले होते, ज्या पाण्याचा पृष्ठभाग पूर्णतः स्थिर आणि नितळ होता. त्या परातीच्या मध्यभागी अतिशय सुस्पष्ट अशा प्रतिबिंबीत रूपात चंद्र होता.

आश्चर्यचकित होऊन कृष्णाने चंद्राकडे दृष्टी टाकली. त्याने आपल्या हाताचे एक बोट पाण्यात घातले आणि नंतर दुसरे, आता चंद्र नागमोडी तरंगांनी माखून अंधुक होऊ लागला होता आणि तरंग उठणे

थांबल्यावर तो पुन्हा एकदा एकत्र सांधला गेला. कृष्ण खुदुखुदु हसू लागला आणि मग त्याने त्याचा संपूर्ण हातच पाण्यात घातला.

तो खेळत असताना यशोदा त्याला पाहत होती. एक चंद्र तिथे बाहेर होता, ज्याचा प्रकाश आत येत होता. एक चंद्र आतमध्ये होता, जो पाण्यामध्ये चमचमत होता. आणि तिथेच तिचा मुलगा होता, जो दोन्ही चंद्रांच्या अपूर्व प्रभामंडळाने आच्छादित झाला होता किंवा कदाचित त्या प्रकाशाने आच्छादित होता जो त्याचा स्वतःचाच होता — पण यातील फरक सांगणे खरच कठीण होते.

*केवढा प्रकाश आहे येथे!* यशोदा विचार करू लागली.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन® । सर्वाधिकार सुरक्षित।